विशेष दिवाणी दावा क्र.७६/२०२२
सय्यद वि. सुलताना
CNR- MH0S060003732022

## निशाणी १३ खालील आदेश

१. प्रतिवादी यांनी दाव्याला मुदतीत कैफियत न दिल्यामुळे त्यांच्याविरुध्द पारित झालेला 'विनाकैफियत आदेश' रद्द करण्यासाठी सदरचा अर्ज दिला आहे. त्यांचे म्हणणेनुसार त्यांचे पती हे मनोरुग्ण असल्यामुळे त्यांच्या उपचारासाठी त्यांना सतत दवाखान्यामध्ये घेवून जावे लागते. तसेच त्यांचा मुलगा परदेशात उदरनिर्वाहकरिता गेला असल्यामुळे घराची संपूर्ण जबाबदारी त्यांच्या एकटीवर आहे. त्यामुळे त्यांना महत्वाचे कागदपत्रे व माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना मुदतीत आपली कैफियत सादर करता आली नाही.

२. वादीने सदर अर्जास तीव्र हरकत नोंदविली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादींना दिनांक ०३.०८.२०२२ रोजी दाव्याचे समन्स प्राप्त झाले आहे. पुरेपुर संधीदेवूनदेखील त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केली नाही. अर्जातील कारण संयुक्तीक नाही. वैकल्पीकरित्या अर्ज मंजूर झाल्यास जास्तीत जास्त दंडावर अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकले. कराराची पूर्तता होवून ताबा मिळण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी कैफियत मुदतीत मांडणे आवश्यक होते. त्यांनी तसे केले नाही. प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स दिनांक ०३.०८.२०२२ रोजी प्राप्त होवूनदेखील त्यांनी मुदतीत कैफियत न दिल्यामुळे त्यांच्याविरुध्द दिनांक २२.०९.२०२२ रोजी कैफियत नाहीचा आदेश पारित करण्यात आला आहे. दाव्याचा मुळ मुद्दा निकाली करण्यासाठी प्रतिवादीची कैफियत आवश्यक आहे. सबब, अर्जाची हकीकत, दाव्याचे स्वरुप, दाव्याचा आजरोजीचा टप्पा व उभयतापक्षांचे वाद विषयाशी निगडीत अनुतोष पाहता, प्रतिवादी यांना कैफियत दाखल करणेसाठी वाढीव संधी देणे योग्य होईल, असे मला वाटते. सदरची संधी देत असताना त्यांच्यावर खर्च बसविणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार आहे. म्हणून, वरील सर्व बाबींचा एकत्रीतरित्या विचार करुन खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. प्रतिवादी यांनी वादीस रक्कम रु.५००/– (रु. पाचशे फक्त) चा खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२.	आदेशाची पुर्तता केल्यानंतर प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

३.	उभयता पक्षांनी आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by SONIAJYOTI AJIT KANSHIDE
Date: 2023.04.28 15:25:35 +0530

दिनांक २६.०४.२०२३	(एस.ए.कानशिडे )

सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, उमरगा.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F.file order is same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer : | L.S.Patil |
| Court Name : | Jt. Civil Judge S.D., Omerga. |
| Date : | 26.04.2023 |
| Order signed by the Presiding Officer on : | 26.04.2023 |
| Order uploaded on : | 27.04.2023 |